CNR NO.MHSO060007932021

<u>नियमित दिवाणी दावा क्र.६१ /२०२१</u>

महेश साठे

**वि.**

रंजन डोंबे, वगैरे

## निशाणी क्रमांक १३५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १६ प्रमाणे वादपत्रातील परिच्छेद क्र.८ ते १० व १४ मधील मजकूर काढुन टाकण्यासाठी (strike out) दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ चे कथन आहे की, वादपत्र परिच्छेद क्र.८ ते १० व १४ मधील मजकूर अनावश्यक (vexatious, frivolous, scandalous) आहे. वादीस दावा दाखल करण्यापुर्वी पासुन माहिती होती की, प्रतिवादी क्र.१ हे वादमिळकतीचे मालक असुन, त्यामध्ये बिगरशेती १ ते २२ भूखंड आहेत. असे असतांना स्वार्थ साधण्याच्या हेतुने काल्पनीक घटना व वादकारण नमुद करुन दावा दाखल केलेला आहे. वादपत्रातील परिच्छेद क्र.८ ते १० व १४ मध्ये खोटी माहिती नमुद करुन वादीने न्यायालयाची दिशाभूल केलेली आहे. एकच जमीन जाणिवपूर्वक दुसऱ्यांदा खरेदी करुन खोटा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे वादपत्रातील परिच्छेद क्र.८ ते १० व १४ मधील मजकूर काढुन टाकण्यात यावा/वगळण्यात यावा. तसेच वादी यांनी खोटी कथने केल्याने न्यायालयाची फसवणूक व दिशाभूल केल्याबाबत वादीवर कारवाई करण्यात यावी.

३. वादीने प्रस्तुतच्या अर्जास त्यांचे म्हणणे (निशाणी क्र.१४७) मांडले. वादीने कथन केले की, अर्जातील मजकूर वादीच्या हिताविरुध्द असुन, खोटा व लबाडीचा आहे. अर्ज कायदेशीर नाही. दाव्यातील सर्व मुद्दे या अर्जाच्या कामी वाचण्यात यावेत. गट क्र.१०३/२ब/२ब/२ हा कधीही कायदेशीररित्या अस्तित्वात आलेला

नव्हता व नाही. नियमित दिवाणी दावा क्र.५९१/२०१७ चा दावा हा गट क्र.१०३/२ब/२ब/२ बाबत प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेला आहे. वादीचा दावा हा गट क्र.१०३/१ बाबत आहे. वादपत्रातील परिच्छेद क्र.८ ते १० व १४ मधील मजकूर खरा व बरोबर आहे. वादीने न्यायालयाची दिशाभूल केलेली नाही. करिता, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. वादीचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीचा लेखी युक्तिवाद (निशाणी क्र.१५१) विचारात घेण्यात आला. प्रतिवादी क्र.१ तर्फे लेखी युक्तिवाद करण्यात आला की, वादीने अर्जास दिलेले म्हणणे वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे. वादीने अर्जातील मजकूर मान्य व कबुल नाही असा मोघम खुलासा केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ हे गट क्र.१०३/२ब/२ब/२ मधील ८१ गुंठे जमीनीचे मालक आहेत. गट क्र.१०३/१ चा अतिरिक्त बोगस उतारा तयार झालेला होता व त्याचा गैरफायदा घेवुन एकच जमीन बेकायदेशीररित्या खरेदी-विक्रीचे व्यवहार झालेले आहेत. परिच्छेद क्र.८ ते १० व १४ मधील मजकूर अनावश्यक व काल्पनीक नमुद केलेला आहे. दाव्यास कारण असल्याशिवाय दावा चालू शकणार नाही. दावा दाखल करण्याच्या चार महिन्याअगोदर प्रतिवादींची मालकी वहिवाटीची कागदपत्रे काढुन जाणिवपूर्वक व त्रास देण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. परिच्छेद क्र.८ ते १० व १४ मधील घटनाक्रम काल्पनीक व बोगस असल्याने तो मजकूर काढुन टाकण्यात यावा. नियमित दिवाणी दावा क्र.११/२०१३ मधील कथनाबाबत मागणी या दाव्यात करणे कायदेशीर तरतुदीत नाही. करिता, अर्ज मंजूर करण्यात यावा.

५. प्रतिवादी क्र.१ तर्फे निशाणी क्र.१५४ वरील यादीसोबत मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे दाखल करण्यात आले. मा. सर्वोच्च न्यायालयाचा **सेंथीलबालाजी वि. ए.पी.गिता व इतर ((२०२३) १६ एस.सी.सी.२७९)** या प्रकरणातील व मा. उच्च न्यायालयाचा **एकनाथ गडकरी वि. मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन (२०११(६) महा. एल. जे. ३६)** या प्रकरणातील न्यायनिर्णय वाचले.

सदरील प्रकरणे ही निवडणुक याचिकेसंदर्भातील आहेत. त्यातील बाबी व या प्रकरणातील बाबी भिन्न असल्याने त्यातील निष्कर्ष या प्रकरणात प्रतिवादी क्र.१ यास उपयोगी पडत नाहीत.

६. ज्या परिच्छेदांबाबत प्रतिवादी क्र.१ यांनी आक्षेप घेतला आहे त्यातील कथने विचारात घेण्यात आली. वादी यांचा गट क्र.१०३/१ व प्रतिवादी क्र.१ यांचा गट क्र.१०३/२ब/२ब/२ यापैकी कोणता बनावट आहे व कोण मिळकतीचे मालक आहेत हे पुराव्याअंती ठरणार आहे. वादीने वादपत्रात गट क्र.१०३/२ब/२ब/२ च्या ७/१२ उताऱ्याबाबत व त्या अनुषंगाने त्यातील मिळकतीमध्ये तयार करण्यात आलेल्या भूखंडाबाबत आक्षेप घेतलला आहे. सदरील आक्षेप पुराव्याअंती निकाली काढणे आवश्यक असुन, वादीची कथने काढल्यास (strike out) दाव्यास अर्थ रहात नाही. परिच्छेद क्र.१४ मध्ये दाव्यास कारण कथन केलेले आहे. वादपत्रामध्ये दाव्यास कारण नमुद करणे हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम १ मधील तरतुदींचे पालन करण्याचा भाग आहे. सदरील कारण प्रत्यक्षात घडले अथवा नाही हे पाहणे पुराव्याचा भाग आहे. त्यामुळे सदरील कारण तसेच परिच्छेद क्र.८ ते १० मध्ये नमुद केलेला मजकूर हा मजकूर निरुपयोगी व अनावश्यक (vexatious, frivolous, scandalous) आहे असे याक्षणी म्हणता येत नाही. करिता, अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

(नीलेश सु. बुद्रुक)

दि. ०८.०९.२०२५

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 08.09.2025 |
| (d) | Uploaded on | : | 09.09.2025 |